# संविधान (एकशे एकावी सुधारणा) अधिनियम,२०१६

[८ सप्टेंबर, २०१६.]

*भारताचे संविधान यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.*

तो, भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, संसदेद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो:-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, संविधान (एकशे एकावी सुधारणा) अधिनियम, २०१६, असे म्हणावे.

(२) तो, केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास* अंमलात येईल, आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अशा कोणत्याही तरतुदीमधील कोणत्याही संदर्भाचा,त्या तरतुदीच्या प्रारंभाचा संदर्भ असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

नवीन अनुच्छेद २४६क चा समावेश करणे.

२. संविधानाच्या अनुच्छेद २४६ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल:-

वस्तू व सेवा कराच्या संबंधात विशेष तरतूद.

"**२४६क.** (१) अनुच्छेद २४६ व २५४ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संसदेस, आणि खंड (२) ला अधीन राहून, प्रत्येक राज्याच्या विधानमंडळास, संघराज्याने किंवा अशा राज्याने बसविलेल्या वस्तू व सेवा कराच्या बाबतीत कायदे करण्याचा अधिकार असेल.

(२)जेव्हा वस्तूंचा, किंवा सेवांचा, अथवा दोन्हींचा पुरवठा, आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात होत असेल तेव्हा, संसदेला, वस्तू व सेवा कराच्या बाबतीत कायदे करण्याचा अनन्य अधिकार असेल.

**स्पष्टीकरण.-** या अनुच्छेदाच्या तरतुदी, अनुच्छेद २७९ क च्या खंड(५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वस्तू व सेवा कराच्या बाबतीत, वस्तू व सेवा कर परिषदेने शिफारस केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.".

---

* कलम १२ साठी अधिसूचना क्रमांक.एस.ओ.२९१५(ई), दिनांक १० सप्टेंबर,२०१६ याद्वारे दिनांक १२/०९/२०१६; कलमे १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२० यांसाठी अधिसूचना क्रमांक.एस.ओ.२९८६(ई), दिनांक १६ सप्टेंबर,२०१६ याद्वारे दिनांक १६/०९/२०१६.

**अनुच्छेद २४८ची सुधारणा.**

**३.** संविधानाच्या अनुच्छेद २४८ मधील, खंड (१) मध्ये, "संसदेला" या मजकुराएवजी, "अनुच्छेद २४६क च्या अधीन राहून, संसदेला" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**अनुच्छेद २४९ ची सुधारणा.**

**४.** संविधानाच्या अनुच्छेद २४९ मधील, खंड (१) मध्ये, "पाठिंबा दिलेल्या ठरावाद्वारे," या मजकुरानंतर, "अनुच्छेद २४६क अन्वये तरतूद केलेला वस्तू व सेवा कर किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**अनुच्छेद २५० ची सुधारणा.**

**५.** संविधानाच्या अनुच्छेद २५० मधील, खंड (१) मध्ये, "आणीबाणीची उद्घोषणा जारी असताना," या मजकुरानंतर, "अनुच्छेद २४६क अन्वये तरतूद केलेला वस्तू व सेवा कर किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**अनुच्छेद २६८ ची सुधारणा.**

**६.** संविधानाच्या अनुच्छेद २६८ मधील, खंड (१) मध्ये, "आणि औषधीय व प्रसाधन पदार्थांवरील अशी उत्पादन शुल्के" हा मजकूर गाळण्यात येईल.

**अनुच्छेद २६८क गाळणे.**

**७.** संविधान (अठ्ठयाऐंशीवी सुधारणा) अधिनियम, २००३ याच्या कलम २ द्वारे समाविष्ट केलेला संविधानाचा अनुच्छेद २६८क गाळण्यात येईल.

**अनुच्छेद २६९ ची सुधारणा.**

**८.** संविधानाच्या अनुच्छेद २६९ मधील, खंड (१) मध्ये, "मालाच्या विक्रीवरील किंवा खरेदीवरील कर" या मजकुराच्या आधी, "अनुच्छेद २६९क मध्ये तरतूद केली असेल त्याखेरीज," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**नवीन अनुच्छेद २६९क समाविष्ट करणे.**

**९.** संविधानाच्या अनुच्छेद २६९ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल :-

**आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात वस्तू व सेवा कराची आकारणी आणि वसुली.**

**"२६९ क.** (१) आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात केल्या जाणाऱ्या पुरवठ्यावरील वस्तू व सेवा कर, भारत सरकारकडून आकारण्यात व वसूल करण्यात येईल आणि असा कर, वस्तू व सेवा कर परिषदेच्या शिफारशींवर, कायद्याद्वारे, संसद तरतूद करील अशा रीतीने, संघराज्य व राज्ये यांच्यामध्ये संविभाजित करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.-** या खंडाच्या प्रयोजनार्थ, भारताच्या राज्यक्षेत्रामध्ये आयात करण्याच्या ओघात केला जाणारा वस्तूंचा, किंवा सेवांचा,अथवा दोन्हींचा पुरवठा हा,आंतरराज्यीय व्यापार

किंवा वाणिज्य यांच्या ओघात केला जाणारा वस्तूंचा, किंवा सेवांचा, अथवा दोन्हींचा पुरवठा असल्याचे मानण्यात येईल.

(२) खंड (१) अन्वये एखाद्या राज्याला संविभाजित केलेली रक्कम, भारताच्या एकत्रित निधीचा भाग बनणार नाही.

(३) जेव्हा खंड (१) अन्वये आकारलेला कर म्हणून वसूल केलेली रक्कम, अनुच्छेद २४६क अन्वये एखाद्या राज्याने आकारलेल्या कराचे प्रदान करण्यासाठी वापर करण्यात आली असेल तेव्हा, अशी रक्कम, भारताच्या एकत्रित निधीचा भाग बनणार नाही.

(४) जेव्हा अनुच्छेद २४६क अन्वये एखाद्या राज्याने आकारलेला कर म्हणून वसूल केलेली रक्कम, खंड (१) अन्वये आकारलेल्या कराचे प्रदान करण्यासाठी वापर करण्यात आली असेल तेव्हा,अशी रक्कम,राज्याच्या एकत्रित निधीचा भाग बनणार नाही.

(५) संसदेला, कायद्याद्वारे, पुरवठ्याचे ठिकाण, आणि आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात वस्तूंचा, किंवा सेवांचा अथवा दोन्हींचा पुरवठा केव्हा घडून येतो हे निर्धारित करण्याची तत्त्वे तयार करता येतील.".

**अनुच्छेद २७० ची सुधारणा.**

१०.संविधानाच्या अनुच्छेद २७०मधील,-

(एक) खंड (१) मध्ये,"अनुच्छेद २६८,२६८क व २६९", या मजकुराऐवजी, "अनुच्छेद २६८,२६९ व २६९क" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) खंड (१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील:-

"(१क) अनुच्छेद २४६ च्या खंड (१)अन्वये संघराज्याने वसूल केलेला कर, खंड (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने संघराज्य व राज्ये यांच्यामध्ये वितरित करण्यात येईल.

(१ख) अनुच्छेद २४६क च्या खंड (१) अन्वये संघराज्याने आकारलेल्या कराचे प्रदान करण्यासाठी ज्याचा वापर करण्यात आला आहे असा, अनुच्छेद २४६क चा खंड (२) आणि अनुच्छेद २६९क यांअन्वये संघराज्याने आकारलेला व वसूल केलेला कर,आणि अनुच्छेद २६९क च्या खंड (१) अन्वये संघराज्याला संविभाजित केलेली रक्कम देखील, खंड (२)मध्ये तरतूद केलेल्या रीतीने संघराज्य व राज्ये यांच्यामध्ये वितरित करण्यात येईल.".

अनुच्छेद २७१ ची सुधारणा.

११.संविधानाच्या अनुच्छेद २७१ मधील, "कोणत्याही वेळी" या मजकुरानंतर, "अनुच्छेद २४६क खालील वस्तू व सेवा कराखेरीज” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

नवीन अनुच्छेद २७९क समाविष्ट करणे.

१२. संविधानाच्या अनुच्छेद २७९ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल:-

वस्तू व सेवा कर परिषद.

"**२७९क.** (१) राष्ट्रपती, संविधान (एकशे एकावी सुधारणा) अधिनियम,२०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, आदेशाद्वारे, वस्तू व सेवा कर परिषद म्हणून संबोधली जाणारी एक परिषद घटित करील.

(२) वस्तू व सेवा कर परिषद, पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल:-

(क) केंद्रीय वित्त मंत्री .......अध्यक्ष;

(ख) प्रभारी महसूल किंवा वित्त केंद्रीय राज्यमंत्री...... सदस्य;

(ग) प्रत्येक राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला प्रभारी वित्त किंवा कराधान मंत्री किंवा इतर कोणताही मंत्री......सदस्य.

(३) खंड (२) च्या उपखंड (ग) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वस्तू व सेवा कर परिषदेचे सदस्य,ते ठरवतील अशा कालावधीसाठी त्यांच्यामधील एका सदस्याची परिषदेचा उपाध्यक्ष म्हणून, शक्य तितक्या लवकर, निवड करतील.

(४) वस्तू व सेवा कर परिषद,-

(क) जे वस्तू व सेवा करामध्ये अंतर्भूत करण्यात येतील असे संघराज्याने, राज्यांनी व स्थानिक संस्थांनी, आकारलेले कर, उपकर व अधिभार;

(ख) ज्या वस्तू व सेवा करास अधीन असतील, किंवा ज्यांना वस्तू व सेवा करातून सूट असेल अशा वस्तू व सेवा;

(ग) आदर्श वस्तू व सेवा कर कायदे, अनुच्छेद २६९क अन्वये आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात केलेल्या पुरवठयांवरील वस्तू व सेवा कर आकारण्याची तत्वे, आकारलेल्या वस्तू व सेवा कराचे संविभाजन आणि पुरवठ्याच्या ठिकाणाचे नियमन करणारी तत्वे;

(घ) ज्या सीमेखाली वस्तू व सेवा यांना, वस्तू व सेवा करातून सूट देता येईल ती उलाढालीची अध: सीमा;

(ङ) वस्तू व सेवा कराच्या पट्टयांसह किमान दराचा समावेश असलेले दर;

(च) कोणत्याही नैसर्गिक विपत्तीमध्ये किंवा आपत्तीमध्ये अतिरिक्त साधनसंपत्ती उभारण्यासाठी, एखाद्या विनिर्दिष्ट कालावधीकरिता कोणताही विशेष दर किंवा कोणतेही विशेष दर;

(छ) अरुणाचल प्रदेश, आसाम, जम्मू व काश्मीर, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड या राज्यांच्या बाबतीत विशेष तरतूद; आणि

(ज) परिषद ठरवील त्याप्रमाणे, वस्तू व सेवा कराशी संबंधित असणारी इतर कोणतीही बाब,

याबाबतीत संघराज्य व राज्ये यांना शिफारशी करील.

(५) वस्तू व सेवा कर परिषद, पेट्रोलियम क्रूड, हाय स्पीड डिझेल, मोटर स्पिरिट (सामान्यतः पेट्रोल म्हणून ओळखले जाणारे), नैसर्गिक वायू व विमानचालन टर्बाइन इंधन यांवर, ज्या दिनांकास वस्तू व सेवा कर आकारण्यात येईल त्या दिनांकाची शिफारस करील.

(६) या अनुच्छेदाअन्वये प्रदान केलेली कामे पार पाडताना, वस्तू व सेवा कर परिषदेला, वस्तू व सेवा कराच्या सामंजस्यपूर्ण संरचनेच्या आणि वस्तू व सेवांकरिता सामंजस्यपूर्ण राष्ट्रीय बाजारपेठेचा विकास करण्याच्या गरजेनुरूप मार्गदर्शन करण्यात येईल.

(७) वस्तू व सेवा कर परिषदेच्या एकूण सदस्य संख्येपैकी अर्ध्या सदस्य संख्येने, तिच्या बैठकींची गणपूर्ती होईल.

(८) वस्तू व सेवा कर परिषद, तिची कामे पार पाडण्याची कार्यपद्धती निर्धारित करील.

(९) वस्तू व सेवा कर परिषदेचा प्रत्येक निर्णय, बैठकीत उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या अधिमान प्राप्त मतांच्या तीन- चतुर्थांशपेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने, पुढील तत्त्वांनुसार, घेण्यात येईल:-

(क) केंद्र सरकारच्या मताला, एकूण दिलेल्या मतांच्या एक-तृतीयांश इतके अधिमान असेल, आणि

(ख) सर्व राज्य शासनांच्या एकत्रित केलेल्या मतांना, एकूण दिलेल्या मतांच्या दोन - तृतीयांश इतके अधिमान असेल.

(१०) वस्तू व सेवा कर परिषदेची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही,-

(क) परिषदेतील कोणतेही पद रिक्त असणे, किंवा तिच्या रचनेत कोणताही दोष असणे;

किंवा

(ख) परिषदेचा सदस्य म्हणून एखाद्या व्यक्तीच्या नियुक्तीत कोणताही दोष असणे;

किंवा

(ग) प्रकरणाच्या गुणवत्तेस बाधक न ठरणारी परिषदेची कोणतीही कार्यपद्धतीविषयक अनियमितता,

केवळ या कारणांमुळे विधिअग्राह्य ठरणार नाही.

(११) वस्तू व सेवा कर परिषद,-

(क) भारत सरकार आणि एक किंवा अधिक राज्ये यांच्यामधील;

किंवा

(ख) एका बाजूला भारत सरकार व कोणतेही राज्य किंवा राज्ये आणि दुसऱ्या बाजूला एक किंवा इतर अधिक राज्ये यांच्यामधील; किंवा

(ग) दोन किंवा अधिक राज्ये यांच्यामधील,

परिषदेच्या शिफारशी किंवा त्यांची अंमलबजावणी यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही विवादावर अधिनिर्णय करण्यासाठी एक यंत्रणा स्थापन करील.".

**अनुच्छेद २८६ ची सुधारणा.**

**१३.** संविधानाच्या अनुच्छेद २८६ मधील, -

(एक) खंड (१) मध्ये,-

(क) "मालाची विक्री किंवा खरेदी जेव्हा,-" या मजकुराऐवजी, "वस्तूंचा किंवा सेवांचा अथवा दोन्हींचा पुरवठा,जेव्हा असा पुरवठा,-" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि उपखंड (क) मध्ये, "घडते;" या मजकुराऐवजी, "घडतो;" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) उपखंड (ख)मध्ये, "मालाची" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला असेल त्या दोन्हीही ठिकाणी,त्या मजकुराऐवजी, "वस्तूंची किंवा सेवांची अथवा दोन्हींची" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (२) मध्ये, "मालाची विक्री किंवा खरेदी ही," या मजकुराऐवजी, "वस्तूंचा किंवा सेवांचा अथवा दोन्हींचा पुरवठा" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि "घडते" या मजकुराऐवजी, "घडतो" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(तीन) खंड (३) गाळण्यात येईल .

अनुच्छेद ३६६ ची सुधारणा.

१४. संविधानाच्या अनुच्छेद ३६६ मधील, -

(एक) खंड (१२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:-

"(१२क) "वस्तू व सेवा कर" याचा अर्थ, मानवी सेवनाकरिता असलेल्या मद्यार्कयुक्त दारूच्या पुरवठ्यावरील करांखेरीज वस्तूंच्या किंवा सेवांच्या अथवा दोन्हींच्या पुरवठ्यावरील कोणताही कर,असा आहे;";

(दोन) खंड २६ नंतर, खालील खंड समाविष्ट करण्यात येतील:-

"(२६क) "सेवा" याचा अर्थ, मालाव्यतिरिक्त कोणतीही गोष्ट,असा आहे;

(२६ख) अनुच्छेद २४६क, २६८, २६९, २६९क आणि अनुच्छेद २७९क यांच्या संदर्भात, "राज्य" यामध्ये विधानमंडळ असलेल्या संघराज्य क्षेत्राचा समावेश होतो;".

अनुच्छेद ३६८ ची सुधारणा.

१५. संविधानाच्या अनुच्छेद ३६८ मधील, खंड (२) च्या परंतुकामधील खंड (क) मध्ये, "अनुच्छेद १६२ किंवा अनुच्छेद २४१," या मजकुराऐवजी, "अनुच्छेद १६२, अनुच्छेद २४१ किंवा अनुच्छेद २७९क," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सहाव्या अनुसूचीची सुधारणा.

१६. संविधानाच्या सहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद (८)च्या उप-परिच्छेद (३)मधील, -

(एक) खंड (ग)मध्ये, शेवटी असलेला "आणि" हा मजकूर गाळण्यात येईल;

(दोन) खंड (घ)मध्ये, "आणि" हा मजकूर शेवटी समाविष्ट करण्यात येईल;

(तीन) खंड (घ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:-

"(ङ) करमणूक व मनोरंजन यांवरील कर.".

सातव्या अनुसूचीची सुधारणा.

१७. संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील,-

(क) सूची एक - संघ सूचीमध्ये,-

(एक) नोंद ८४ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल:-

"८४. भारतात निर्मिलेल्या किंवा उत्पादिलेल्या पुढील वस्तूंवरील उत्पादन शुल्क:-

(क) पेट्रोलियम क्रूड;

(ख) हाय स्पीड डिझेल;

(ग) मोटर स्पिरिट (सामान्यतः पेट्रोल म्हणून ओळखले जाणारे);

(घ) नैसर्गिक वायू;

(ङ) विमानचालन टर्बाइन इंधन;

(च) तंबाखू व तंबाखूजन्य उत्पादने," ;

(दोन) नोंदी ९२ व ९२ग गाळण्यात येतील;

(ख) नोंद दोन - राज्य सूचीमध्ये,-

(एक) नोंद ५२ गाळण्यात येईल;

(दोन) नोंद ५४ ऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईलः-

"५४. पेट्रोलियम क्रूड, हायस्पीड डिझेल, मोटार स्पिरिट (सामान्यतः पेट्रोल म्हणून ओळखले जाणारे), नैसर्गिक वायू, विमानचालन टर्बाइन इंधन व मानवी सेवनाकरिता असलेली मद्यार्कयुक्त दारू यांच्या विक्रीवरील कर, परंतु यामध्ये,अशा वस्तूंच्या, आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात केल्या जाणाऱ्या विक्रीचा अथवा आंतरराष्ट्रीय व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात केल्या जाणाऱ्या विक्रीचा समावेश होत नाही.";

(तीन) नोंद ५५ गाळण्यात येईल;

(चार) नोंद ६२ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईलः-

"६२. पंचायतीने किंवा नगरपालिकेने किंवा प्रादेशिक परिषदेने किंवा जिल्हा परिषदेने आकारलेल्या व वसूल केलेल्या मर्यादेत, करमणूक व मनोरंजन यांवरील कर."

**वस्तू व सेवा कर लागू केल्यामुळे महसुलामध्ये झालेल्या हानीबद्दल राज्यांना भरपाई.**

१८. संसद, वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी केल्यामुळे होणाऱ्या महसुलाच्या हानीबद्दल पाच वर्षांच्या कालावधीसाठी, वस्तू व सेवा कर परिषदेच्या शिफारशीवरून, कायद्याद्वारे, राज्यांना भरपाई देण्यासाठी तरतूद करील.

संक्रमणकालीन तरतुदी.

१९. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, जी संविधानाच्या तरतुदींशी विसंगत आहे अशी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही राज्यात अमलात असलेल्या वस्तूंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या कराशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही कायद्याची कोणतीही तरतूद, सक्षम विधानमंडळाद्वारे किंवा इतर सक्षम प्राधिकरणाद्वारे सुधारणा करण्यात येईपर्यंत किंवा निरसित करण्यात येईपर्यंत अथवा अशा प्रारंभापासून एका वर्षाचा कालावधी समाप्त होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

अडचणी दूर करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार.

२०. (१) जर या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे संविधानाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, (या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे संविधानाच्या तरतुदी असलेल्या या अधिनियमास राष्ट्रपतीची अनुमती मिळाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी त्या जशा असतील त्याप्रमाणे संविधानाच्या तरतुदींमधील संक्रमणाच्या संबंधातील कोणत्याही अडचणीसह) राष्ट्रपतीस,आदेशाद्वारे, अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, राष्ट्रपतीला आवश्यक किंवा इष्ट वाटेल त्याप्रमाणे, या अधिनियमाद्वारे किंवा कायद्याद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे संविधानाच्या कोणत्याही तरतुदीच्या कोणत्याही अनुकूलनासह किंवा फेरबदलासह अशा तरतुदी करता येतील:

परंतु असे की, अशा अनुमतीच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**डॉ. जी नारायण राजू,**

**सचिव, भारत सरकार.**